# पोलीस आयुक्तालय,
# मिरा-भाईंदर,वसई-विरार

सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.पोआ/मिभाववि/आस्था-१/पोलीस शिपाई-२०२१/नियुक्ती आदेश/२०२३ दि. ३०/०५/२०२३

**विषय :- पोलीस शिपाई भरती-२०२१**
**पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत.**

----ooooo----

**आदेश :-**

मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालयाचे आस्थापनेवरील सन २०२१ मधील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती प्रक्रिया-२०२१ आयोजित करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेत मैदानी चाचणी व लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे सामाजिक व समातंर आरक्षणानूसार पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांपैकी खालील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, वैद्यकीय तपासणी व पुर्व चरित्र्य पडताळणी झाली असून नमूद उमेदवारांना मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तलयाचे आस्थापनेवर हजर झाल्या तारखेपासून **"पोलीस शिपाई" (गट-क) संवर्गात अस्थायी पदावर** वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ : रु.२१७०० -६९,१०० मधील प्रारंभिक वेतन रु.२१७००/- या वेतनावर (विशेष वेतन रु.७५०/- व नियमानुसार अनुज्ञेय भत्ते) **दि.३१/०५/२०२३ पासून** पुढील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | चेस्ट नंबर | लिंग | मूळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ अंकुश गाडेकर | 17221 | MALE | NT(C) | Open | General |
| 2 | अजिनाथ श्रीराम आंधळे | 28721 | MALE | NT(D) | Open | General |
| 3 | नंदकिशोर पांडुरंग कपाळे | 40835 | MALE | Open | Open | Sportsman |
| 4 | विठ्ठल चंद्रकांत कदम | 40403 | MALE | NT(B) | Open | Sportsman |
| 5 | अनिल निलकंठ रुपनर | 40595 | MALE | NT(C) | Open | Sportsman |
| 6 | प्रिया वसंत गावडे | 45711 | FEMALE | OBC | Open | *Women Res.* |
| 7 | नितीन प्रभाकर घोलप | 40501 | MALE | OBC | Open | Sportsman |
| 8 | हेमंत संतोष नागे | 24309 | MALE | SC | SC | General |
| 9 | अर्जुन दिनकर शेडगे | 40352 | MALE | OBC | Open | Sportsman |
| 10 | पवन शिवाजी गुंजाळ | 40239 | MALE | OBC | Open | Sportsman |
| 11 | विनायक सुर्यकांत निकम | 40240 | MALE | EWS | Open | Sportsman |
| 12 | अमोल दत्तात्रय चितळे | 40561 | MALE | EWS | Open | Sportsman |
| 13 | अशिफ हमीद तडवी | 40470 | MALE | ST | Open | Sportsman |
| 14 | प्रेम संतोष खुरंगे | 40576 | MALE | NT(C) | Open | Sportsman |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | चेस्ट नंबर | लिंग | मूळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 15 | बजरंगराज अनिल गोडासे | 40706 | MALE | EWS | Open | Sportsman |
| 16 | तेजस लक्ष्मण कदम | 40740 | MALE | EWS | EWS | Sportsman |
| 17 | नागेश लक्ष्मण संकपाळ | 40753 | MALE | EWS | EWS | Sportsman |
| 18 | मुकेश अशोक बिरारी | 40650 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 19 | शुभम बापु कालेल | 40409 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 20 | सागर उत्तम बोडके | 40503 | MALE | NT(D) | NT(D) | Sportsman |
| 21 | ललित प्रकाश तिरमाले | 40748 | MALE | NT(B) | NT(B) | Sportsman |
| 22 | अक्षित उमकांत राठोड | 40741 | MALE | VJ(A)/DT(A) | VJ(A)/DT(A) | Sportsman |
| 23 | अजित मारुती पाटील | 40351 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 24 | गजाननसीन विठ्ठलसिंग चव्हाण | 40316 | MALE | VJ(A)/DT(A) | VJ(A)/DT(A) | Sportsman |
| 25 | प्रमोद प्रकाश कुंभार | 8443 | MALE | OBC | Open | Police Child |
| 26 | अक्षय ज्ञानेश्वर दरेकर | 40591 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 27 | प्रज्वल बापु शिंगाडे | 40577 | MALE | NT(C) | NT(C) | Sportsman |
| 28 | मनिषा सुरेश गायकवाड | 46963 | FEMALE | NT(B) | NT(B) | *Women Res.* |
| 29 | यादव नामदेव वाळेकर | 40666 | MALE | NT(C) | NT(C) | Sportsman |
| 30 | हेमचंद्र महादेव सांदुर | 40321 | MALE | EWS | EWS | Sportsman |
| 31 | प्राचाली प्रमोद मोकाटे | 49636 | FEMALE | OBC | OBC | Sportsman |
| 32 | तुकाराम लक्ष्मण शेलार | 40338 | MALE | EWS | EWS | Sportsman |
| 33 | वैभव सज्जन करे | 40500 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 34 | दिनेश विष्णु नागवे | 40474 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 35 | पूजा दिपक राजोळे | 43441 | FEMALE | OBC | OBC | *Women Res.* |
| 36 | आकाश बाबासाहे कातोरे | 40254 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 37 | संकेत संदिपान चौधरी | 40302 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 38 | पंडीत रेवननाथ विधाते | 40339 | MALE | OBC | OBC | Sportsman |
| 39 | प्रथमेश विजय धरणे | 33374 | MALE | EWS | EWS | Police Child |
| 40 | राजेंद्र वीरभद्र ताटपल्लेवार | 40683 | MALE | SBC | SBC | Sportsman |
| 41 | तजश्री लक्ष्मण बांबरे | 48496 | FEMALE | ST | ST | Sportsman |
| 42 | द्वारकाधीश साहेबराव गुंबडे | 40477 | MALE | ST | ST | Sportsman |
| 43 | भुषण प्रकाश भवर | 40349 | MALE | ST | ST | Sportsman |
| 44 | बाबाराव मारोतीराव गड्डामवाड | 40594 | MALE | ST | ST | Sportsman |
| 45 | बाबासाहेब कृष्णा खिल्लारे | 40613 | MALE | SC | SC | Sportsman |
| 46 | रोहित सखाराम बच्छाव | 40651 | MALE | SC | SC | Sportsman |
| 47 | सुंदरी जेठया मेरया | 49835 | FEMALE | ST | ST | Sportsman |
| 48 | नवनाथ शिवाजी कुरुडे | 40290 | MALE | ST | ST | Sportsman |
| 49 | प्रतिक दयाराम करवते | 40348 | MALE | ST | ST | Sportsman |
| 50 | तेजस्वी अण्णा बनसोडे | 49890 | FEMALE | SC | SC | Sportsman |
| 51 | सरिता सिताराम भोये | 48957 | FEMALE | ST | ST | Sportsman |
| 52 | आम्रपाली भरत थेंगे | 48989 | FEMALE | SC | SC | Sportsman |

अटी व शर्ती :

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न देता अथवा आगाऊ सुचना न देता केव्हाही सेवेतुन सेवामुक्त करण्यात येईल.

२. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर दि. २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल एसएलपी च्या निर्णयाच्या अधीन राहुन सदर नियुक्ती देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना **सहा महिन्याचे आत** त्यांचे जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** देण्यात आली आहे.

४. मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती झाल्यानंतर ६ महिन्यांचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहिल. उमेदवाराची जात वैधता पडताळणी झाली नसल्यास नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणीसाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे या कार्यालयाचे मार्फत प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल. जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दि.१२/१०/१९९३ नुसार उमेदवार सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करण्यास पात्र ठरेल. आणि त्यांनी घेतलेले अन्य कोणतेही लाभ काढून घेतले जाण्यास सुध्दा पात्र ठरतील.

५. मागासवर्ग प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे (अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्ग वगळून) नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, आ.दु.ब.घटक आरक्षातुन निवड झालेल्या तसेच समांतर आरक्षाणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी अधिन नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती नंतर त्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांची कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**६. नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात कधीही उमेदवाराच्या चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास अथवा त्याबाबत काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास तसेच उमेदवाराने भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये खोटी/चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता संबंधीत उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल. व त्याबाबत त्यांना कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.**

७. उमेदवाराने भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैद्य बाबींचा अवलंब केल्याचे किंवा भरतीसाठी सादर केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्र खोटे/बोगस/बनावट असल्याचे भविष्यात केव्हाही निदर्शनास आल्यास/निष्पन्न झाल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांस व कायदेशिर कारवाईस ते पात्र ठरतील.

८. प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारची इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल. तसेच उमेदवरास त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

९. पोलीस दलातील नोकरीबाबतची पात्रता व योग्यता आजमविण्यासाठी पोलीस प्रशिक्षण विद्यालयात मानसिक चाचणी घेण्यात येईल. या मानसिक चाचणीत अपात्र ठरल्यास सेवामुक्त करण्यात येईल.

१०. उमेदवारास प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. प्रशिक्षण कालावधीत उमेदवरामध्ये दोष आढळल्यास, उमेदवाराची वर्तणूक गैरशिस्तीची आढळून आल्यास, कोणतेही बेशिस्त गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा ऱ्हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना/नोटीस न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

११. शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणात/प्रशिक्षण पुर्ण करण्यात स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास/भगोडा

झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम ७८ (१) (viii) नुसार सेवा समाप्त (**Terminate from Service**) करण्यात येईल.

१२. महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दि. २६.०४.२०१२ अन्वये नियुक्ती नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्यांचेकडून प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्यांनी जितके महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च म्हणुन प्रती महिना रुपये २०००/- (प्रती मासिक रुपये दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यात येईल, व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे उमेदवारास बंधनकारक आहे.

१३. सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२/१२/१९९७ अन्वये धारण केलेल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्या राजीनामा देण्यासंबंधी नियुक्ती प्राधिका-यास एक महिन्याची पूर्व सूचना किंवा पूर्व सुचनेऐवजी एक महिन्याचे वेतना एवढी रक्कम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे प्रथम भरावी लागेल. राजीनामा मंजूर करणे/नाकारणे याबाबत सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील. तसेच एकदा राजीनामा मंजुर झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुर्ननियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१४. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम १२ अन्वये पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे आणि प्रशिक्षणांती घेण्यात येणारी परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि. २६/१०/२०१७ नुसार व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ व मधील नियम ३(२) उपखंड (अ) मधील सुधारणा नुसार घटक बदलीबाबतचे नियम लागु राहतील.

१६. ज्या संवर्गातुन/जातीच्या प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाली आहे, तो संवर्ग/प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

१७. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.शा.नि.क्र.वसीअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दि. ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र नियुक्तीच्या दिनांका पासुन २ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.

१८. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५ नुसार त्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना अंतर्गत नव्याने विहित करण्यात आलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहिल. तथापी त्यांना निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही. तसेच शासन वित्त विभाग क्र.रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दि. ३१/३/२०२३ अन्वये नमुना-१ प्रमाणे कुटुंबाचा तपशिलाचे हमीपत्र व नमुना-२ प्रमाणे सेवेत असतांना विकलांगतेमुळे शासकीय सेवेसाठी असमर्थ ठरल्यास/मृत्यू पावल्यास अनुज्ञेय लाभ देण्यांबाबतचा विकल्प देणे बंधनकारक आहे.

१९. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/बारा, दिनांक २८.०३.२००५ व क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/बारा, दिनांक ०१.०७.२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधीन नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे सेवेत राहण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील.

२०. महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्र.२०७ अन्वये पोलीस शिपाई पदासाठी हिंदी बोली भाषा स्तर ही परिक्षा उत्तींण होण्याची अट विहित केली आहे. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.म.भा.प.-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि.३०/१२/१९८७ नुसार नियुक्ती नंतर हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर उमेदवारास हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

२१. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) १९५६, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजा, सेवानिवृत्ती, वर्तणूक इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी निर्गमित केलेले स्थायी आदेश, परिपत्रक व नियम लागू होतील.

२२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ३(१)(ड) (सुधारणा नियम २०१६) नुसार मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण करणे आवश्यक आहे. सदर परवाना धारण न केलेल्या उमेदवाराने नियुक्ती नंतर पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर २ वर्षाच्या आत परवाना धारण करणे बंधनकारक आहे, विहित कालावधीत वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.

२३. पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यावर पोलीस विभागातील वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे व सक्षम प्राधिका-याने वाहन चालक कर्तव्याच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाचे/सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

२४. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम १३ (सुधारणा नियम २०१६) नुसार नियुक्तीच्यावेळी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय क्र. सा.प्र.वि.क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये नियुक्तीच्यावेळी सदर संगणक अर्हता धारण केली नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर संगणक आर्हता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहिल. अन्यथा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२८/५/२०१८ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र टराल.

२५. नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत इतर ठिकाणी कार्यरत असतील अशा उमेदवारांनी पोलीस शिपाई भरतीसाठी भरलेल्या आवेदन अर्जानुसार संबंधित कार्यालयाची परवानगी घेतलेली असावी. तसेच पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश कर्तव्यावर हजर होण्यापूर्वी या कार्यालयात सादर करणे आवश्यक राहिल.

२६. महराष्ट्र शासन, वित्त विभाग राजपत्र भाग-४-अ, दि.३०/१२/२०२१ मधील महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार जन्मतारीख अचूक असल्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसा एकदा केलेल्या जन्म तारखेच्या नोंदीमध्ये बदल करण्याची विनंती स्विकारली जाणार नाही.

२७. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि.२२/११/२०२१ अन्वये शासकीय सेवेत नव्याने नियुक्ती झाल्यानंतर किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चिती/वेतनवाढी अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या/प्रदानाच्या अनुषंगाने संपूर्ण सेवा कालावधीत नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्य:स्थितीत/भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनासस परत करण्याचे लेखी वचनपत्र देणे बंधनकारक राहिल.

२८. महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.रप्रस-१११४/प्र.क्र.११ सेवा-५, दि.१० जून,२०१५ अन्वये लेखी स्वग्राम घोषणापत्र तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ नियम २४५ नुसार भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ रहाण्याबाबत शपथ/प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.

२९. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या,१२ दिनांक २८.०५.२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत संबंधीत उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे.

सदर कालावधीत हजर न झाल्यास तुम्ही नोकरीची संधी गमावाल व तुमचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. यासाठी तुम्ही दिलेल्या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही.

३०. उमेदवारांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असुन सदर नियुक्ती स्विकारत असल्याबद्दल व सदर आदेश प्राप्त झाल्याबाबत दुय्यमप्रतीवर स्वाक्षरी करुन परत द्यावी.

**( श्रीकांत पाठक )**
**अपर पोलीस आयुक्त**
**मिरा-भाईंदर,वसई-विरार**

**प्रति- सर्व संबंधित उमेदवार**

**प्रत:- राखीव पोलीस उप निरीक्षक, पोलीस मुख्यालय, मि.भा.व.वि.**

२/- नियुक्ती दिलेले उमेदवार पोलीस शिपाई पदावर हजर झाल्याचा दिनांक इकडील कार्यालयास कळविण्यात यावा. कर्तव्यावर हजर झालेनंतर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना किट व सरंजाम अदा करावा.

**प्रत:- प्रमुख लिपीक लेखा शाखा, लेखा शाखा, मि.भा.व.वि.**

२/- वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

३/- नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे सेवार्थप्रणालीमध्ये मुदतीत माहिती भरावी. तसेच नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेबाबत आवश्यक माहिती उमेदवारांकडून प्राप्त करुन सेवार्थ प्रणालीमध्ये अद्यावत करावी. उमेदवरांचे वेतन विहित वेळेत होण्यांचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

**प्रत:- आस्थापना लिपीक-४, आस्थापना शाखा.**

२/- पोशि पदावर हजर झालेल्या उमेदवरांचे सन २०२३-२४ करिता गणवेष भत्ता अनुदान मंजुरीचे आदेश हजर झाल्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत निर्गमित करावे.

**प्रत:- पोलीस नोटीस (प्रसिध्दीसाठी)**